४-१-२०२० - दै. पुढारी

# 'कर्तव्य'मुळे दिव्यांग बांधवांना नवी दिशा

## जीवन सुसह्य करता आल्याचे समाधान : सौ. वेदांतिकाराजे

सातारा : प्रतिनिधी

पर्यावरण, निसर्ग रक्षणाबरोबरच जनसामान्यांची सेवा करण्याचे काम 'कर्तव्य'च्या माध्यमातून अविरतपणे सुरु आहे. मोतीबिंदू शिबीर असेल, जयपूर फूट वाटप शिबीर असेल किंवा तीनचाकी सायकल आणि व्हील चेअर वाटप अशा विविध प्रकाराच्या आरोग्य विषयक शिबीरातून पीडित लोकांना आपले जीवन आनंदाने जगता यावे, यासाठी प्रयत्न केले जातात. असे उपक्रम सातत्याने राबवून दिव्यांग आणि अपंग बांधवांच्या जीवनाला एक नवी दिशा देवून या सर्व बांधवांचे जीवन सुसह्य करता आले, याचे कर्तव्य सोशल ग्रुपला मनस्वी समाधान वाटत आहे, असे प्रतिपादन ग्रुपच्या संस्थापिका सौ. वेदांतिकाराजे भोसले यांनी केले.

कर्तव्य सोशल ग्रुपच्या वतीने सातारा शहर आणि परिसरातील सात अपंग व्यक्तींना नवीन तीनचाकी सायकल आणि व्हील चेअर वाटपप्रसंगी सौ. वेदांतिकाराजे भोसले बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव चव्हाण, कर्तव्य सोशल ग्रुपचे सदस्य विलास कासार, सुहास ओहाळकर, महेश यादव, डी. पी.शेख, रवी पवार, सुनिल भोसले, ओंकार परदेशी, चंदन घोडके आदी उपस्थित होते.



दिव्यांग बांधवांना तीनचाकी सायकलचे वाटप करताना सौ. वेदांतिकाराजे भोसले व कर्तव्य सोशल ग्रुपचे सदस्य.

यावेळी अनिल नरहर साठे, बाळु त्रिंबक ओव्हाळ, दुर्योधन श्रीरंग बाबर, रविंद्र बबन बोर्डे, ओमकार हणमंत भिसे, संजय देवरे, लक्ष्मण भिमराव मुळीक या दिव्यांग बांधवांना कर्तव्य सोशल ग्रुपच्यावतीने मोफत तीनचाकी सायकल, व्हील चेअर भेट देण्यात आली. बहुतांश दिव्यांग बांधव शेतकरी अथवा कष्टकरी असतात. त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, त्यांच्या दैनंदिन कामकाजात त्यांच्या शरीराला मदत मिळावी, या उद्देशाने कर्तव्य सोशल ग्रुपच्या माध्यमातून हे वाटप सातत्याने केले जाते. त्याचा लाभ अनेक दिव्यांग बांधवांना झाला आहे आणि यापुढेही होत राहील, असे सौ. वेदांतिकाराजे यांनी यावेळी स्पष्ट कले.